“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार”

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY


## Newspaper Clippings

## 2023-24

तरुण भारत
शुक्रवार १५ डिसेंबर २०२३

# डीकेएएससीच्या खेळाडूंचे आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत यश

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स, अँड कॉमर्स कॉलेजच्या खेळाडूंनी इस्लामपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धत उत्कृष्ठ कामगिरी करत यश संपादन केले आहे. यामध्ये ६२ ते ६५ किलो वजनी गटात युवराज कदम व ८६ ते ९२ किलो वजनी गटात रामानुज सिंग याने रौप्य पदक प्राप्त केले. त्यांना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांचे प्रोत्साहन लाभले. जिमखाना विभाग प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.



इचलकरंजी : आंतरविभागीय बॉक्सिग स्पर्धेत यश मिळवलेल्या डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर.

महान कार्य

मार्गशीर्ष शु.३ पूर्वाषाढा/उ.षाढा
दि. १५ डिसेंबर २०२३

# डीकेएएससीचे आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत यश

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स, अँड कॉमर्स कॉलेजच्या खेळाडूंनी इस्लामपूर येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत यश संपादन केले आहे. यामध्ये ६२ ते ६५ किलो वजनी गटात युवराज कदम याने रौप्यपदक मिळवले तर ८६ ते ९२ किलो वजनी गटात रामानुज सिंग याने रौप्यपदक प्राप्त केले. या सर्व खेळाडूंना प्राचार्य डॉ. एस.एम. मणेर यांचे प्रोत्साहन लाभले. तर महाविद्यालयाचे जिमखाना विभाग प्रमुख प्रा.मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई, प्रा.प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत शनिवार १६ डिसेंबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससीमध्ये भारतीय भाषा दिवसनिमित्त विद्यार्थी–विद्यार्थिनींनी विविध भारतीय भाषांमध्ये आविष्कार सादर केला.

# डीकेएएससीमध्ये भारतीय भाषा दिवस साजरा

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात महान साहित्यिक चिन्नास्वामी सुब्रमण्यम् भारती यांची जयंती अर्थात भारतीय भाषा दिवस हा समारंभ उत्साहात पार पडला. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभासाठी डॉ. प्रतिमा पैलवान यांची प्रमुख उपस्थिती होती.

आविष्कारांमध्ये संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, भोजपुरी, मारवाडी, कानडी, मालवणी, कोकणी, व्रहाडी, बंगाली इत्यादी भाषा व बोलीभाषांमधील अभिवाचन, कथा, कविता, एकपात्री, नाटिका, प्रहसन, गाणी अशा विविध प्रकारांमध्ये सादरीकरण केले. डॉ. प्रतिमा पैलवान म्हणाल्या, इचलकरंजीमध्ये राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडते. विविध राज्यातील लोक उद्योग–व्यवसायासाठी येथे राहतात. त्यांनी मराठी आपलीशी केली आहे. डीकेएएससी महाविद्यालयात या बहुभाषकांची मुले–मुली शिक्षण घेतात. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. सुनिता वेल्हाळ, अंजली उबाळे यांची विशेष उपस्थिती होती. स्वागत समृद्धी निकम, प्रास्ताविक सरगम पोवार, पाहुण्यांचा परिचय योगिता सोनटक्के, आभार प्रेम मदीहाळी या विद्यार्थ्यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन वाङ्मय मंडळ प्रमुख प्रा. संजय सुतार, प्रा. भारती कोळेकर व प्रा. रोहित शिंगे यांनी केले. सूत्रसंचालन संजीवनी कदम व प्रीती मिसे यांनी केले.

महान कार्य

मार्गशीर्ष शु.५ धनिष्ठा
दि. १७ डिसेंबर २०२३

# 'डीकेएएससी'मध्ये भारतीय भाषिक दिवस साजरा

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा



इचलकरंजी शहरात राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडते. विविध राज्यातील लोकं उद्योग – व्यवसायासाठी येथेच राहतात. अशांनी मराठी आपलीशी केली आहे. डीकेएएससी महाविद्यालयात या बहुभाषकांची मुले–मुली शिक्षण घेतात. या मुलांनी सादर केलेले भाषिक अविष्कार भारतीय भाषा दिवस सार्थ ठरवणारे आहेत, असे गौरवोद्गार डॉ.प्रतिभा पैलवान यांनी काढले. डीकेएएससी महाविद्यालयात महान साहित्यिक चिन्नास्वामी सुब्रमण्यम् भारती यांची जयंती अर्थात भारतीय भाषा दिवस उत्साहात झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. विद्यार्थ्यांनी संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, भोजपुरी, मारवाडी, कानडी, मालवणी, कोकणी, वऱ्हाडी, बंगाली आदी भाषा व बोलीभाषांमधील अभिवाचन, कथा, कविता, एकपात्री, नाटिका, प्रहसन, गाणी अशा विविध प्रकारांमध्ये सादर केले.डॉ.डी.सी. कांबळे, प्रा.डी.ए.यादव, डॉ.सुनिता वेल्हाळ, अंजली उबाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत समृद्धी निकम यांनी केले. प्रास्ताविक सरगम पोवार यांनी केले. परिचय योगिता सोनटक्के यांनी करून दिला. सूत्रसंचालन संजीवनी कदम, प्रीती भिसे यांनी केले. आभार प्रेम मदीहाळी यांनी मानले.

सकाळ

# धोका व्यवस्थापन स्वीकारू नका

## भूषण चावरे : इचलकरंजीतील डीकेएएससी महाविद्यालयात व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. १७ : भांडवली बाजारपेठेतून जादा उत्पन्न प्राप्तीचे कौशल्य गुंतवणूकदारांनी प्राप्त करायचे झाल्यास पारंपरिक व जुनी पद्धत बदलायला हवी. गुंतवणुकीबाबत विश्वास, सवयी आणि कौशल्य या त्रिसूत्राची सांगड घालणे आवश्यक आहे. यासाठी धोका व्यवस्थापन स्वीकारू नये, असा सल्ला सीए भूषण चावरे यांनी दिला.

येथील डीकेएएससी महाविद्यालयात कॉमर्स व बीकॉम आय. टी. विभाग, सीए असोसिएशनतर्फे भांडवली बाजारपेठ व गुंतवणूकीचे पर्याय विषयावरील व्याख्यानचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, सीए असोसिएशनचे अध्यक्ष शहेनशहा मुजावर यांची प्रमुख उपस्थिती होती. चावरे यांनी वित्त, भांडवल व गुंतवणूक क्षेत्राची पार्श्वभूमी विशद केली. अर्थव्यवस्था, बाजारपेठ, उद्योग, व्यवसाय व सेवा क्षेत्रात होणारी गुंतवणूक, त्याद्वारे भांडवली बाजारपेठेवर होणारा परिणाम स्पष्ट केले. ज्ञानाचा अभाव, सर्वसाधारण आव्हाने, धोका व्यवस्थापन, विखुरलेले शिक्षण, शासकीय धोरणे, जुनी पद्धत याबाबतही मांडणी केली.



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात सीए भूषण चावरे यांनी भांडवली बाजारपेठ व गुंतवणूक या विषयावर मार्गदर्शन केले.**

भांडवली बाजारपेठेत टिकून राहणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी भाषा समृद्ध असणे, नीटनेटकेपणा, नम्रता, विपणन कौशल्ये, निर्णय कार्य, मोठी स्वप्ने, यशाची गुरुकिल्ली, तसेच आरोग्य, संपत्ती व संबंध या बाबी महत्त्वाच्या असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. दीपक बड्डी याने गुंतवणुकीचे अनुभव सांगितले. मुस्कान सुतार विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. विभागप्रमुख प्रा. विजय पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. जी. एम. डिसुझा व प्रा. मृणाली पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. कल्पना जाधव यांनी आभार मानले. आयटी समन्वयक प्रा. डॉ आर. एस. रॉड्रिक्स, प्रा. पल्लवी होगाडे, प्रा. आयेशा गफारी, प्रा. कोमल कोळी, डॉ. वर्षा शिंदे आदी उपस्थित होते.

Kolhapur, Ichalkaranji-Today
18/12/2023 Page No. 2

सकाळ | मंगळवार, १९ डिसेंबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाच्या आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत यश मिळवलेल्या दोघांचा सत्कार प्राचार्य डॉ. एस.एम. मणेर यांच्या हस्ते झाला.

## 'डीकेएएससी'च्या खेळाडूंचे बॉक्सिंग स्पर्धेत यश

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत यश मिळवले. इस्लामपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत युवराज कदम, रामानुज सिंग यांनी उत्कृष्ठ कामगिरी केली. ६२ ते ६५ किलो वजनी गटात कदम याने रौप्यपदक मिळवले. ८६ ते ९२ किलो वजनी गटात रामानुज सिंग याने रौप्यपदक प्राप्त केले. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी सत्कार केला. जिमखाना विभाग प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ
मंगळवार, १९ डिसेंबर २०२३




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात एड्स निर्मूलन जनजागृती कार्यक्रमात अर्चना वाघमारे यांनी मार्गदर्शन केले.

## 'डीकेएएससी'मध्ये रक्त तपासणी शिबिर

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात एड्स निर्मूलन जनजागृती व्याख्यान व मोफत रक्त तपासणी शिबिर झाले. एनएसएस, एनसीसी विभाग आणि आयजीएम रुग्णालयातर्फे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. प्रमुख पाहुण्या अर्चना वाघमारे यांनी टीबी व एडसविषयी माहिती दिली. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा विशाल कांबळे, प्रा. विनायक भोई, प्रा. विशाल गोडबोले, डॉ. अनिल जांभळे आदी उपस्थित होते.

लोकमत
epaper.lokmat.com
बुधवार, दि. २० डिसेंबर २०२३

मानल.

## डीकेएएससीमध्ये रक्त तपासणी शिबिर

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात एड्स निर्मूलन जनजागृती व्याख्यान व मोफत रक्त तपासणी शिबिर झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस. एम. मणेरे होते. अर्चना वाघमारे यांनी टीबी व एड्सविषयी माहिती दिली. डी.सी. कांबळे, विशाल कांबळे, विनायक भोई, विशाल गोडबोले, अनिल जांभळे उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

# प्रा. सचिन जाधव यांना पीएच.डी.



सचिन जाधव

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयातील प्रा. सचिन जाधव यांना शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. मिळाली. भूगोलशास्त्र अधिविभागातून त्यांनी सांगली जिल्ह्यातील डाळिंब पिकाचा भूआर्थिकदृष्ट्या अभ्यास या विषयावर संशोधन कार्य पूर्ण करून पीएच.डी. संपादन केली. सांगली जिल्ह्यातील डाळिंब शेतीला भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाययोजनांसह त्यांनी प्रखर संशोधन निष्कर्ष मांडले आहेत. त्यांना डॉ. एस. एस. कोठावळे, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, डॉ. एस. एम. मणेर, डॉ. अनिल पाटील, डॉ. डी. सी. कांबळे, बजरंग जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
23/12/2023 Page No. 2

सकाळ

कोल्हापूर, सोमवार, २५ डिसेंबर २०२३

# डीकेएएससी महाविद्यालयात गणित दिन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिन साजरा झाला. गणित विभागातर्फे भारतीय गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिवस राष्ट्रीय गणित दिवसाचे आयोजन केले. अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी गणिततज्ज्ञ रामानुजन यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. बीएससी भाग ३ मधील सन्मती रावळ, राकेश प्रजापत यांनी रामानुजन यांचा जीवनप्रवास व त्यांचे गणित या विषयातील आमूलाग्र योगदानाविषयी मनोगत व्यक्त केले. गणित विभागप्रमुख प्रा. डी. जे. मुंगारे, प्रा. डॉ. सागर सुतार यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. सागर सुतार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अपूर्वा कांबळे यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत संवाद

सोमवार २५ डिसेंबर २०२३

# डीकेएएससीमध्ये राष्ट्रीय गणित दिन साजरा

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये गणित विभागाच्यावतीने राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला. महान भारतीय गणित तज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिवस देशात राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा केला जातो. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी विद्यार्थ्यांना रामानुजन यासारख्या विद्वानांची चरित्रे आपले जीवन घडवण्यासाठी महत्त्वाची आहेत यावेळी बी. एस्सी. भाग ३ मधील सन्मती रावळ व बी. एस्सी. भाग १ मधील राकेश प्रजापत यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी प्रा. डी. जे. मुंगारे, प्रा. डॉ. सागर सुतार, प्रा. डी. ए. यादव, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सागर सुतार यांनी केले. आभार प्रा. अंपूर्वा कांबळे यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

सोमवार | मार्गशीर्ष शु.१४ रोहिणी
दि. २५ डिसेंबर २०२३

महान कार्य | ३

# डीकेएएससीमध्ये राष्ट्रीय गणित दिन

इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मध्ये महाविद्यालयाच्या गणित विभागाच्या वतीने राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला. २२ डिसेंबर हा महाम भारतीय गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिवस सबंध भारत देशात राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा केला जातो. याचेच औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना रामानुजन यांसारख्या थोर विद्वानांची चरित्रे आपले जीवन घडवण्यासाठी महत्त्वाची आहेत व त्यांचा आदर्श घेऊन आपण आपल्या उज्वल भविष्यासाठी सतत प्रयत्न करावेत. असे मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
१ जानेवारी २०२४/९

# श्रीमती आक्काताई महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची ग्रंथालय अभ्यास भेट

**केसरी वृत्तसेवा**

इचलकरंजी : येथील श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयातील मराठी विभागाच्या विद्यार्थिनींनी दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालय इचलकरंजी येथे अनुबंध करारांतर्गत महाविद्यालयाच्या ग्रंथालयास अभ्यास भेट दिली. ग्रंथालयामध्ये असणारा ज्ञानाचा सागर विद्यार्थिनींना माहीती व्हावा, या हेतूने या अभ्यास भेटीचे आयोजन केले होते. यासाठी प्राचार्य डॉ. एस एम मणेर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी व्ही. पी. यादव यांनी ग्रंथालयशास्त्र, ग्रंथालयाचे कामकाज, ग्रंथालयामध्ये असणारी ग्रंथसंपदा, विश्वकोश निर्मिती प्रक्रिया याबद्दल माहिती दिली. या अभ्यास भेटीचे संयोजन डॉ. सुभाष जाधव, डॉ. प्रियंका कुंभार यांनी केले. भोरे सानिका, सन्मती चौगुले, रोमा डांगरे, अंकीता हजारे, सुप्रिया कोळी, श्रुती रूकडे, प्रियंका पाटील, गायत्री नायकल, प्राची मगदूम या विद्यार्थिनी सहभागी होत्या.

CS Scanned with CamScanner

सकाळ सोमवार, १ जानेवारी, २०२४

## कन्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींची अभ्यास भेट

**इचलकरंजी :** श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयातील मराठी विभागाच्या विद्यार्थिनींनी डीकेएएससी महाविद्यालयातील ग्रंथालयास अभ्यास भेट दिली. महाविद्यालयाची खरी ओळख ही समृद्ध ग्रंथालयातून होत असते. त्यामुळे ग्रंथालयामध्ये असणारा ज्ञानाचा सागर विद्यार्थिनींना माहीत व्हावा, या हेतूने या अनुबंध करारांतर्गत या अभ्यास भेटीचे आयोजन केले होते. यासाठी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांचे मार्गदर्शन लाभले. ग्रंथालय विभाग प्रमुख व्ही. पी. यादव यांनी ग्रंथालयशास्त्र, ग्रंथालयाचे कामकाज, ग्रंथालयामध्ये असणारी ग्रंथसंपदा, विश्वकोश निर्मिती प्रक्रिया याबाबत माहिती दिली. राणी साळुंखे, शोभा कुंभार, प्रसाद शितोळे यांचे सहकार्य लाभले. अभ्यास भेटीचे संयोजन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुभाष जाधव, डॉ. प्रियंका कुंभार, प्रा. प्रतिभा पैलवान यांनी केले.

CS Scanned with CamScanner

महान कार्य
मार्गशीर्ष कृ.६ पुर्वा फाल्गुनी
दि. २ जानेवारी २०२४

# 'कन्या'च्या विद्यार्थिनींची ग्रंथालय अभ्यास भेट

इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा येथील श्रीमती , अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयातील मराठी विभागाच्या. विद्यार्थिनींनी दत्ताजीराव कदमं आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालय येथे अनुबंध करारांतर्गत महाविद्यालयाच्या ग्रंथालयास अभ्यास भेट दिली.

यावेळी एएससी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस एम मणेर यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. यावेळी ग्रंथालय विभाग प्रमुख व्ही.पी.यादव यांनीही मार्गदर्शन केले. एएससी महाविद्यालय ग्रंथालय प्रशासकीय सेवक, सौ राणि साळुंखे, .शोभा कुंभार आणि श्री प्रसाद शितोळे यांचे सहकार्य लाभले. या संपूर्ण अभ्यास भेटीचे संयोजन मराठी विभागाचे प्रमुख प्रो.डॉ.सुभाष जाधव,डॉ प्रियंका कुंभार,प्रा.प्रतिभा पैलवान यांनी केले.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
३ जानेवारी २०२४/५

# डीकेएएससीमध्ये बेसिक मेहंदी प्रशिक्षण

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँण्ड कॉमर्स महाविद्यालयात बेसिक मेहंदी प्रशिक्षण कोर्स उद्घाटन सोहळा प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या उपस्थितीत झाला.

महाविद्यालयातील विद्यार्थिनींना शिक्षणाबरोबरच स्वावलंबनाचे महत्त्व समजावणे त्याचप्रमाणे त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता येण्यास मदत करता यावी या उद्देशाने बेसिक मेहंदी प्रशिक्षण कोर्स राबविण्यात येत आहे.

उद्घाटन प्राचार्य डॉ. मणेर यांनी केले. डॉ. ए. ए. घारे यांनी स्वागत केले. कार्यक्रमासाठी प्रा. अर्चना तराळ, प्रा. रिटा रॉड्रिक्स यांचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र **केसरी** ३ जानेवारी २०२४/७



इचलकरंजी : ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल प्रणव रावळ याचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर.

# ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी प्रणव रावळची निवड

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के. ए. एस. सी. कॉलेजचा खेळाडू प्रणव प्रकाश रावळ याने औरंगाबाद येथे झालेल्या साऊथ वेस्ट झोन इन्टर युनिव्हर्सिटी तलवारबाजी स्पर्धेत उत्कृष्ठ कामगिरी करून शिवाजी विद्यापीठ संघाला इप्पी या प्रकारात ब्रॉन्झ मेडल मिळवून दिले आहे. प्रणव रावळ याची अमृतसर येथे होणाऱ्या ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याला प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांचे प्रोत्साहन लाभले. मुजफ्फर लगीवाले, विनायक भोई, प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CamScanner Scanned with CamScanner

सकाळ, गुरुवार, ४ जानेवारी, २०२४

# सावित्रीबाई फुलेंच्या कार्याला उजाळा

## डीकेएएससी कॉलेज

प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. प्राचार्य डॉ. मणेर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती देत विविध पैलू स्पष्ट केले. डॉ. सुनीता वेल्हाळ यांनी सावित्रीबाई यांच्या कार्याचा आढावा घेतला. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. विशाल गोडबोले, प्रा. रोहित शिंगे उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

महान कार्य
मार्गशीर्ष कृ.८ हस्त
दि. ४ जानेवारी २०२४



# डी.के.ए.एस.सी. कॉलेजच्या खेळाडुचे तलवारबाजीत यश

इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के.ए. एस. सी. कॉलेजचा खेळाडू कु. प्रणव प्रकाश रावळ याने औरंगाबाद येथे साऊथ वेस्ट झोन इन्टर युनिव्हर्सिटी तलवारबाजी स्पर्धेत उत्कृष्ठ कामगिरी करून शिवाजी विद्यापीठ संघाला इप्पी या प्रकारात ब्रॉन्झ मेडल मिळवून दिले आहे.

प्रणव रावळ याची अमृतसर येथे होणाऱ्या ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर सर यांचे प्रोत्साहन लाभले. तर महाविद्यालयाचे जिमखाना प्रमुख मुजफ्फर लगीवाले, विनायक भोई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शुक्रवार ५ जानेवारी २०२४



इचलकरंजी : डीकेएएससीमध्ये मेहंदी प्रशिक्षण उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, पूजा कोळेकर, डॉ. ए. ए. घारे, मान्यवर

# डीकेएएससीमध्ये मेहंदी प्रशिक्षणाचे उद्घाटन

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभाग आणि महिला सबलीकरण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने बेसिक मेहंदी प्रशिक्षण कोर्स उद्घाटन सोहळा प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. विद्यार्थिनींना शिक्षणाबरोबरच स्वावलंबनाचे महत्व समजावणे त्याचप्रमाणे त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता येण्यास मदत करता यावी, या उद्देशाने चार दिवसीय बेसिक मेहंदी प्रशिक्षण कोर्स महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या कोर्ससाठी आराध्या ब्युटी पार्लरच्या ब्युटीशियन पूजा कोळेकर प्रशिक्षक म्हणून उपस्थित होत्या. महाविद्यालयाच्या महिला सबलीकरण समितीच्या समन्वयक डॉ. ए. ए. घारे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रशिक्षकांचा परिचय हिंदी विभाग प्रमुख डॉ. अंजली उबाळे यांनी केले. सूत्रसंचालन सनोफर नायकवडी यांनी केले. आभार प्रा.डॉ. प्रभा पाटील यांनी मानले. कार्यक्रमासाठी हिंदी विभागातील प्रा. अर्चना तराळ, प्रा. रिटा रॉड्रिक्स यांचे सहकार्य लाभले. या प्रशिक्षणाचा विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.

CS Scanned with CamScanner

महान कार्य
मार्गशीर्ष कृ.१३ ज्येष्ठा
दि. ९ जानेवारी २०२४



# प्रतिक मगदूम याची आंतर विद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी निवड

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के.ए. एस. सी. कॉलेज इचलकरंजी चा खेळाडू कु. प्रतिक मधुकर मगदूम याने शहाजी कॉलेज, कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय शरीर सौष्ठव स्पर्धेत ६० किलो खालील वजनी गटात उत्तम शरीर यष्टीचे प्रदर्शन करून सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला. या गटात एकूण २३ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. या २३ स्पर्धकातून प्रतीक मगदूम याने सुवर्ण पदक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेच्यात मानाचा तुरा रोवला आहे.

प्रतिक याची कालीकत येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. प्रतिक हा एन. एस. फिटनेस जीम मध्ये नागेश सुतार यांच्या प्रशिक्षणाखाली पुढील स्पर्धेची तयारी करत आहे. या खेळाडूस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एम. मणेर यांनी प्रोत्साहन देऊन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तर महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत गुरुवार ११ जानेवारी २०२४

# कन्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींची ग्रंथालय अभ्यास भेट

प्रतिनिधी
इचलकरंजी

- ग्रंथालयातील कामकाजाची घेतली माहिती

येथील श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयातील मराठी विभागाच्या विद्यार्थिनींनी दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालय इचलकरंजी येथे अनुबंध करारांतर्गत महाविद्यालयाच्या ग्रंथालयास अभ्यास भेट दिली.

ग्रंथालय म्हणजे महाविद्यालयाचा आत्मा असतात, महाविद्यालयाची खरी ओळख ही समृद्ध ग्रंथालयातून होत असते. त्यामुळे या ग्रंथालयामध्ये असणारा ज्ञानाचा सागर विद्यार्थिनींना माहिती व्हावा, या हेतूने या अभ्यास भेटीचे आयोजन केले होते. यासाठी एएससी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मगेर यांचे मार्गदर्शन लाभले.

ग्रंथालय विभाग प्रमुख व्ही. पी. यादव यांनी ग्रंथालयशास्त्र, ग्रंथालयाचे कामकाज, ग्रंथालयामध्ये असणारी ग्रंथसंपदा, विश्वकोश निर्मिती प्रक्रिया या सर्वांबद्दल सविस्तर माहिती विद्यार्थिनींना दिली.

या ग्रंथालय अभ्यास भेटीमुळे विद्यार्थिनींच्या ज्ञानात भर पडली भविष्यात त्याचा त्यांना नक्कीच उपयोग होईल. एएससी महाविद्यालय ग्रंथालय प्रशासकीय सेवक, राणी साळुंखे, शोमा कुंभार, प्रसाद शितोळे यांचे सहकार्य लाभले. अभ्यास भेटीचे संयोजन मराठी विभागाचे प्रमुख डॉ. सुभाष जाधव, डॉ. प्रियंका कुंभार, प्रा. प्रतिमा पैलवान यांनी केले. सानिका मोरे, सन्मती चौगुले, रोमा डांगरे, अंकीता हजारे, सुप्रिया कोळी, श्रृती रूकडे, प्रियंका पाटील, गायत्री नायकल, प्राची मगदूम, श्वेता कोमटी, सुप्रिया कोळी या विद्यार्थिनी सहभागी होत्या.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
११ जानेवारी २०२४/

# डीकेएएससी मध्ये नेट सेट कार्यशाळा संपन्न

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मध्ये पदव्युत्तर विभगातील विद्यार्थ्यांसाठी नेट/सेट परीक्षा पूर्व तयारी कार्यशाळा घेतली. कार्यशाळेमध्ये पहिल्या पेपरसाठी डॉ. विनोदकुमार कुंभार हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी परीक्षा पद्धती, परीक्षामध्ये विचारले जाणारे प्रश्न, परीक्षा स्वरूप व पहिल्या पेपर मधील महत्वाचे घटक यावर विध्यार्थीना मार्गदर्शन केले.प्रा. आकाश ब्राह्मणे आणि प्रा. अभिजीत पाटील यांनी समाजशास्त्र पेपर संदर्भात मार्गदर्शन केले त्यामध्ये त्यांनी समाजशास्त्रीय संकल्पनाचा अभ्यास परीक्षेच्या दृष्टीकोनातून कसा करणे आवश्यक आहे, हे सांगितले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शनिवार १३ जानेवारी २०२४

# डीकेएएससीमध्ये विश्व हिंदी दिन

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या वतीने आयोजित विश्व हिंदी दिवस समारोह आनंदाच्या वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर यांच्या हस्ते करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना विश्व हिंदी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. अंजली उबाळे यांनी केले. आभार सनोफर नायकवडी हिने मानले. सूत्रसंचालन प्रा. किशोरी टोणपे यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा. अर्चना तराळ, प्रा. अपर्णा कांबळे यांचे सहकार्य लाभले. यावेळी विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत
शनिवार १३ जानेवारी २०२४

# डीकेएएससीमध्ये कार्यशाळेस प्रतिसाद

प्रतिनिधी
इचलकरंजी

डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागातर्फे थ्रँऊर्ड या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली गेली होती. कार्यशाळेचा उद्घाटन सोहळा प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर यांच्या उपस्थितीत झाला. प्रमुख पाहुणे विशाल पिंजानी व दीपा शिपुरकर उपस्थित होते. कार्यशाळेत पुरुष व स्त्री यांच्या व्यतिरिक्त,तृतीयपंथी, समलिंगी, भिन्नलिंगी त्यांचाही समावेश होतो, असे असले तरीही अशा व्यक्तींना समाजात फारसे महत्वाचे स्थान दिले जात नाही. आपण सर्वजण समाजाचा एक घटक म्हणून यांना समाजामध्ये सन्मानाने वागणूक कशा पद्धतीने दिली पाहिजे. जेणेकरून अशा लोकांचे मानसिक खच्चीकरण व आत्महत्या यांसारखे संकटे दूर होतील.



इचलकरंजी : डीकेएएससी येथे कार्यशाळेत बोलताना दीपा शिपुरकर.

स्वागत व प्रास्ताविक डॉ. पी.के वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. एस. एम. पोवार यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. एन. एच. शेख यांनी केले. कार्यक्रमासाठी सकाळ सत्राचे प्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्राणीशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. पी. के वाघमारे, डॉ. एन. एच. शेख, डॉ. एस. एम. पोवार , डॉ. एस. टी. इंगळे डॉ. वैशाली ढोबळे, डॉ. ए. के. जांभळे, श्रीमती एस. एस. शेख श्रीमती एस. आर. पाटील, व्ही. एम. पाटील उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार १५ जानेवारी २०२४

# डीकेएएससीमध्ये पत्रकार दिन साजरा

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे आद्यपत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जयंती – पत्रकार दिन उत्साहात झाला. ज्येष्ठ पत्रकार संजय खूळ यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, प्रमुख पाहुणे, प्राचार्य व मान्यवरांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

संजय खूळ म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळातील पत्रकारिता ही स्वातंत्र्य, देशनिर्माण, समाजजागृती इत्यादी कार्याला वाहिलेली ध्येयनिष्ठ सेवा होती. पुढील काळात वृत्तपत्र सृष्टीतील तांत्रिक गोष्टींमधील सुधारणा यामुळे पत्रकारांचे बरेच काम सोपे झाले. आज साधारणपणे पंधरा रुपयांपेक्षा जास्त प्रतिप्रत निर्मितीमूल्य असणारे वृत्तपत्र आपल्याला पाच रुपयांमध्ये मिळते. जाहिरात देणाऱ्या संस्था या वृत्तपत्रांना पाठबळ देतात. त्यामुळे जाहिरात सदिच्छा या अलीकडील वृत्तपत्रसृष्टीचा अविभाज्य भाग झाल्या आहेत.

प्राचार्य डॉ. मणेर म्हणाले, समाजाला वस्तुनिष्ठ विचार करायला लावणारे पत्रकारिता हे समाजशिक्षण आहे. एखादी बातमी घडली हे त्वरित सांगणारी इलेक्ट्रॉनिक माध्यमे आजच्या काळात प्रभावी आहेत पण बातमी मागील संदर्भ शोधून त्याची विस्तृत मांडणी वाचकांपर्यंत पोहोचवणे ही वृत्तपत्रांची पत्रकारांची जबाबदारी आहे.

पर्यवेक्षक डॉ. डी. सी कांबळे, प्रा. डी. ए. यादव, पत्रकार ऋषिकेश राऊत, वृत्तपत्र विक्रेते मोहन एरंडोले यांची विशेष उपस्थिती होती. प्रा. संजय सुतार यांनी स्वागत केले. प्रास्ताविक प्रा. ए. एस. कटकोळे यांनी केले. आभार प्रा. डी. ए. यादव यांनी मानले. सूत्रसंचालन रोहित शिंगे यांनी केले.



इचलकरंजी : डीकेएएससीमध्ये दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमा पूजनप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, ज्येष्ठ पत्रकार संजय खूळ, ऋषिकेश राऊत, डॉ. डी. सी कांबळे, प्रा. डी. ए. यादव, वृत्तपत्र विक्रेते मोहन एरंडोले, प्राध्यापक, प्राध्यापिका आदी.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार १५ जानेवारी २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात मेहंदी प्रशिक्षण शुभारंभ-प्रसंगी प्रशिक्षिका पूजा कोळेकर यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर.

# डीकेएएससीमध्ये बेसिक मेहंदी प्रशिक्षण कोर्सचे उद्‌घाटन

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभाग आणि महिला सबलीकरण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने बेसिक मेहंदी प्रशिक्षण कोर्स उद्‌घाटन सोहळा प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. महाविद्यालयातील विद्यार्थिनींना शिक्षणाबरोबरच स्वावलंबनाचे महत्व समजावले त्याचप्रमाणे त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता येण्यास मदत करता यावी या उद्देशाने चार दिवसीय बेसिक मेहंदी प्रशिक्षण कोर्स महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या कोर्ससाठी आराध्या ब्युटी पार्लरच्या ब्युटीशियन पूजा कोळेकर प्रशिक्षक म्हणून उपस्थित होत्या. उद्‌घाटक व अध्यक्ष प्राचार्य डॉ. मणेर यांनी विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या महिला सबलीकरण समितीच्या समन्वयक डॉ. ए. ए. धारे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रशिक्षकांचा परिचय हिंदी विभाग प्रमुख डॉ. अंजली उबाळे यांनी केले. सूत्रसंचालन सनोफर नायकवडी यांनी केले. आभार प्रा.डॉ. प्रभा पाटील यांनी मानले. कार्यक्रमासाठी हिंदी विभागातील प्रा. अर्चना तराळ, प्रा. रिटा रॉड्रिक्स यांचे सहकार्य लाभले. प्रशिक्षणात विद्यार्थिनींनी लाभ घेतला.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र केसरी

१५ जानेवारी २०२४/६

## 'डी.के.ए.एस.सी'त विश्व हिंदी दिवस उत्साहात

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या वतीने आयोजित विश्व हिंदी दिवस समारोह मोठ्या उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रिकेचे उद्घाटन महाविद्यालयाचेप्राचार्यडॉ.एस.एम. मनेर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित मार्गदर्शनपर व्याख्यानामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनेर यांनी हिंदीचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्थान याबद्दल मार्गदर्शन केले.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना विश्व हिंदी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्वागत डॉ. अंजली उबाळे, आभार सनोफर नायकवडी, सूत्रसंचालन प्रा. किशोरी टोणपे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

लोकमत
सोमवार, दि. २२ जानेवारी २०२४

नवे शैक्षणिक धोरण

# डिजिटलला गरजेपेक्षा जास्त महत्त्व जाणवते

## डॉ. एस. एम. मणेर यांचे प्रतिपादन

कॉलेज कॅम्पस

अतुल आंधी
लोकमत न्यूज नेटवर्क

इचलकरंजी : केंद्र सरकारने आणलेले नवीन शैक्षणिक धोरण पाच स्तंभांवर आधारित आहे. सर्वांना सहज उपलब्ध होणारे शिक्षण, समानता, गुणवत्ता, सर्वांना परवडणारे, तंत्रज्ञानावर भर, विद्यार्थ्यांना आवडीनुसार शिक्षण निवडण्याची मुभा देणारे आहे. मात्र, या धोरणात डिजिटल शिक्षणास गरजेपेक्षा जास्त महत्त्व दिल्याचे जाणवते, असे मत इचलकरंजीतील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एम. मणेर यांनी 'लोकमत'शी बोलताना व्यक्त केले. नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना भौतिक सुविधांची गरज भासणार आहे. त्यामुळे या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकारकडून निधीची तरतूदही व्हावी, अशी अपेक्षाही डॉ. मणेर यांनी व्यक्त केली.

डॉ. मणेर म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाचा शासनाने चांगला निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांना आवडणारे शिक्षण घेण्याची मुभा मिळणार, हे चांगलेच आहे. पारंपरिक शिक्षणात कालानुरूप बदल करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे हे नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते. प्राथमिक शाळेपासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्वस्तरांवर गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सार्वत्रिक प्रवेश सुनिश्चित करणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होणार आहे.परंतु या धोरणात ऑनलाइन आणि डिजिटल शिक्षणास नको तेवढे महत्त्व दिले आहे. ते देशातील



### प्रवेशाबाबतची अडचण होणार

विद्यार्थ्याने एखाद्या महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर त्याला ऑनलाइन शिक्षण अन्यत्र घ्यावे लागत असल्यास त्या विद्यार्थ्यास दोन्हीकडे फी भरावी लागणार का, याबाबत या धोरणात अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतची अडचण होणार असल्याकडे मणेर यांनी लक्ष वेधले.

### नियोजनानुसार नवीन कोर्स सुरू करणार

दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयात मेजर-मायनर कोर्स, खुला निवडक कोर्स, व्यावसायिक आणि कौशल्यवर्धित कोर्स, कौशल्य संवर्धन अभ्यासक्रम, त्याचबरोबर क्रीडा, तंदुरुस्ती, निरोगीपणा यासाठीचे सी.सी. कोर्स सुरू करण्यासाठीचे नियोजन करण्यात आले आहे. यामधून विद्यार्थ्यांना कुशल बनवण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी संस्थेकडून येणाऱ्या सूचनांनुसार २०२४-२०२५ ची रूपरेषा ठरवली जाणार असल्याचे मणेर म्हणाले.

वंचित समूहांना, आदिवासी, डोंगराळ, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना, त्याचबरोबर विजेची समस्या, नेटवर्कची समस्या असणाऱ्या ठिकाणी तंत्रज्ञानाच्या साधनांअभावी शक्य होईलच, असे नाही.

Scanned with CamScanner

सकाळ

# पथनाट्य स्पर्धेत डीकेएएससी अव्वल

## युवा स्पंदन स्पर्धा : लघुनाट्य स्पर्धेत महाडिक शैक्षणिक संकुल प्रथम

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. २१ : येथील राज्यस्तरीय युवास्पंदन सांघिक कला स्पर्धा उपक्रमाच्या अंतर्गत आविष्कार पथनाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक डीकेएएससी कॉलेज (इचलकरंजी) यांनी मिळवले. तर लघुनाटिका स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक नानासाहेब महाडिक शैक्षणिक संकुल (पेठनाका) यांनी मिळवले. मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल यांच्यावतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

पथनाट्य स्पर्धेतील द्वितीय क्रमांक शिवाजी विद्यापीठ संघाने मिळविला. तर तृतीय क्रमांक डीआरके कॉलेज (कोल्हापूर) या संघाने आणि उत्तेजनार्थ क्रमांक र.भा. माडखोलकर महाविद्यालय



इचलकरंजी : राज्यस्तरीय युवास्पंदन सांघिक कला प्रकारात आविष्कार पथनाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक डीकेएएससी कॉलेजने मिळवले.

(चंदगड) यांनी मिळविला. स्पर्धेतील संघानी सार्वजनिक स्वच्छता, राष्ट्रीय एकात्मता, लिंगभाव समानता, माणुसकी, जातीभेद, शिक्षण समस्या, इत्यादी विषयांवर परखड भाष्य करणारी प्रबोधनपर पथनाट्ये सादर केली.

लघुनाटिका स्पर्धेतील द्वितीय क्रमांक डीकेएएससी कॉलेज यांनी तर तृतीय क्रमांक डीआरके कॉलेज यांनी मिळविला. उत्तेजनार्थ क्रमांक नाट्यहर्ष (पुणे) या संघाने प्राप्त केला. लघुनाटिका स्पर्धेतील संघानी स्त्रियांवरील अन्याय, अंधश्रद्धा, मासिक पाळी, भ्रष्टाचार आंतरजातीय विवाह, सद्यस्थिती, आदी विषय उपहास विडंबन आणि प्रबोधन अशा विविध प्रकारच्या शैलीमध्ये मांडले.

या दोन्ही स्पर्धांसाठी सुनील पाटील (सांगली), अरुण दळवी (इचलकरंजी) आणि केतकी पाटील (कोल्हापूर) यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. स्पर्धेचा प्रारंभ रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष नितीनकुमार कस्तुरे व सेक्रेटरी सुरेश चौगुले, ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. मिलिंद दांडेकर, मनोरंजन मंडळाचे माजी अध्यक्ष अशोक बोरगावकर व परीक्षकांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि नटराज प्रतिमा पूजन करून करण्यात आला. स्पर्धा समन्वयक संतोष आबाळे यांनी स्वागत केले. परीक्षकांचा परिचय कादंबरी माळी यांनी करून दिला.

पारितोषिक वितरण ज्येष्ठ वक्ते प्रा. अशोक दास यांच्या हस्ते करण्यात आले. मनोरंजन मंडळाचे अध्यक्ष प्रा. समीर गोवंडे यांनी आभार मानले. स्पर्धा येथील श्रीमंत घोरपडे नाट्यगृह आणि घोरपडे चौकात झाल्या.

Kolhapur, Main
22/01/2024 Page No. 4

सकाळ सोमवार, २२ जानेवारी, २०२४




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात कवीसंमेलनात बोलताना ज्येष्ठ कवयित्री वैशाली नायकवडे.

# डीकेएएससी महाविद्यालयात कवी संमेलन

**इचलकरंजी :** येथे डीकेएएससी महाविद्यालयात रानकवी ना. धों. महानोर यांना आदरांजली 'हिरव्या बोलीचा शब्द' व 'अक्षरदिंडी' या भित्तीपत्रिका व निमंत्रित कवींचे कवी संमेलन झाले. श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह व मराठी भाषा संवर्धन पंधरवडा संयुक्त औचित्य साधून मराठी विभाग व वाङ्मय मंडळातर्फे आयोजन केले. ज्येष्ठ कवयित्री वैशाली नायकवडे यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे अनावरण केले. कवी संमेलनात अवंतिका खराडे, प्रियंका भाटले, संजीवनी कदम या विद्यार्थिनींनी कविता सादर केल्या. कवी पाटलोबा पाटील व कवी दादासाहेब जगदाळे यांच्या कवितांनी संमेलनात रंगत आणली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर होते. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

# समूहनृत्यात 'डीकेएएससी' मुलींचा संघ प्रथम

## इचलकरंजीत युवास्पंदन स्पर्धा उत्साहात

इचलकरंजी, ता. २२ : मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ सेंट्रल यांच्या वतीने आयोजित २४ व्या 'युवास्पंदन' या स्पर्धा उपक्रमाच्या अंतर्गत वैयक्तिक आणि समूहनृत्य या दोन्ही स्पर्धा चुरशीने आणि उत्साहात पार पडल्या. समूहनृत्य स्पर्धेत डीकेएएससी कॉलेज इचलकरंजीच्या मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला, तर वैयक्तिक नृत्य स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजय आलासे (पट्टणकोडोली) याने प्राप्त केला.

समूहनृत्य स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या मुलांच्या ग्रुपने द्वितीय क्रमांक मिळवला, तर युफोरिया, इचलकरंजी या संघाने तृतीय क्रमांक मिळविला. वैयक्तिक नृत्य स्पर्धेत गंधाली पारनाईक हिने द्वितीय क्रमांक तर साक्षी बारवाडे हिने तृतीय क्रमांक मिळविला. सिद्धी भस्मे आणि भक्ती सोनटक्के यांनी उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केले. या स्पर्धांत इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली, कराड भागातील स्पर्धकांनी सहभाग घेतला.

रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष नितीनकुमार कस्तुरे, नाट्य परिषद मुंबईचे तसेच मसाप पुणेचे संचालक राजन मुठाणे, कोल्हापूरचे रंगकर्मी संजय दिवाण आणि परीक्षकांच्या हस्ते नटराज प्रतिमापूजन करण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभ मर्दा फौंडेशनचे कार्यकारी विश्वस्त शामसुंदर मर्दा, मनोरंजन मंडळाचे अध्यक्ष प्रा. समीर गोवंडे, रोटरी क्लब इचलकरंजी सेंट्रलचे सचिव सुरेश चौगुले, रंगकर्मी प्रा. मिलिंद दांडेकर, सायली होगाडे यांच्या उपस्थितीत झाला.

संतोष आबाळे यांनी प्रास्ताविक केले. संजय होगाडे यांनी स्वागत केले. स्पर्धांसाठी मोहिनी दिवाण (कोल्हापूर), इरा बेलापुरे (कराड) आणि रत्नाकर शेळके (पुणे) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. वैयक्तिक नृत्य स्पर्धेचे सूत्रसंचालन अनिरुद्ध दांडेकर व प्रवीण लायकर यांनी केले तर समूहनृत्य स्पर्धेचे सूत्रसंचालन कपिल पिसे व सचिन चौधरी यांनी केले. येथील श्रीमंत घोरपडे नाट्यगृहात झालेल्या या स्पर्धांना रसिकांचा चांगला प्रतिसाद लाभला.



इचलकरंजी : युवास्पंदन समूहनृत्य स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक मिळविला.

Kolhapur, Main
23/01/2024 Page No. 5

सकाळ

# 'डीकेएएससी' सलग दुसऱ्यांदा विजेता

## अभय चषक स्टाफ क्रिकेट स्पर्धा : राज्यातील ३२ संघांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. २२ : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित अभय चषक स्टाफ क्रिकेट स्पर्धेमध्ये डीकेएएससी महाविद्यालयाने सलग दुसऱ्या वर्षी अजिंक्यपद पटकावले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा कोल्हापूरमधील रुईकर कॉलनी मैदान व मेरी वेदर ग्राउंडवर झाली. स्पर्धेत संस्थांतर्गत राज्यभरातील एकूण ३२ संघांनी सहभाग घेतला होता.

आर्टस् कॉमर्स कॉलेज नागठाणे, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय धाराशीव, स्वामी विवेकानंद संस्था कॅम्पस व एलबीएस महाविद्यालय सातारा या संघांवर मात करत डीकेएएससी संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला होता. अंतिम सामन्यात विवेकानंद वॉरियर्स या संघाविरुद्ध आठ षटकांत १०२ धावसंख्या उभारून त्यांना ७४ धावसंख्येवर रोखून निर्विवाद विजय मिळवला. संघाला प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते व मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे आदींच्या उपस्थितीत विजयी चषक देण्यात आला. प्रशिक्षक प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, कर्णधार प्रा. विनायक भोई यांनी चषक स्वीकारला. प्रा. मुजफ्फर लगीवाले यांना मालिकेतील उत्कृष्ट फलंदाज व मालिकावीर पुरस्काराने गौरविले.



कोल्हापूर : अभय चषक क्रिकेट स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजने अजिंक्यपद मिळवले.

Kolhapur, Kopjillha
23/01/2024 Page No. 8

दक्षिण महाराष्ट्र केसरी जानेवारी २०२४/५

# 'अभय चषक' क्रिकेट स्पर्धेत डीकेएएससी कॉलेज अजिंक्य

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे, कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभय चषक स्टाफ क्रिकेट स्पर्धेमध्ये डीकेएएससी महाविद्यालय सलग दुसऱ्या वर्षी अजिंक्य झाले. आर्ट्स- कॉमर्स कॉलेज नागठाणे, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव, संस्था कॅम्पस टीम सी व एलबीएस महाविद्यालय सातारा या संघांवर मात करत डीकेएएससी संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला होता. अंतिम सामन्यात विवेकानंद वॉरियर्स या संघाविरुद्ध आठ षटकात १०२ ही धावसंख्या उभारून त्यांना ७४ धावसंख्येवर रोखून विजय मिळवला. डीकेएएससीच्या विजेत्या संघाला कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते व संस्था सीईओ कौस्तुभ गावडे यांच्या उपस्थितीत विजयी चषक देण्यात आला. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, कर्णधार प्रा. विनायक भोई यांनी हा विजेता चषक स्वीकारला. संघातील खेळाडू प्रा. मुजफ्फर लगीवाले यांना मालिकेतील उत्कृष्ट बॅट्समन व मालिकावीर या पुरस्काराने गौरविण्यात आले.

CS Scanned with CamScanner



# युवास्पंदन समूहनृत्य स्पर्धेत डीकेएएससी कॉलेज प्रथम

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

येथील मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन आणि रोटरी क्लब सेंट्रल यांच्यावतीने २४ व्या युवास्पंदन स्पर्धा उपक्रमांतर्गत वैयक्तिक आणि समुहनृत्य पार पडल्या. यावेळी समुहनृत्य स्पर्धेत डीकेएएससी कॉलेज मुलींच्या संघाने प्रथम, तर वैयक्तिक नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक विजय आलासे, पट्टणकोडोली याने प्राप्त केला.

समूहनृत्य स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या मुलांच्या ग्रुपने द्वितीय क्रमांक मिळवला तर युफोरिया, इचलकरंजी या संघाने तृतीय क्रमांक मिळविला. वैयक्तिक नृत्य स्पर्धेत गंधाली पारनाईक हिने द्वितीय क्रमांक तर साक्षी बारवाडे हिने तृतीय क्रमांक मिळविला. सिद्धी भस्मे आणि भक्ती सोनटक्के यांनी उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केले.स्पर्धा कार्यक्रमाच्या सुरुवातीला रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष नितीनकुमार कस्तुरे, नाट्य परिषद मुंबईचे तसेच मसाप पुणेचे संचालक राजन मुठाणे, कोल्हापूरचे रंगकर्मी संजय दिवाण आणि परीक्षकांच्या हस्ते नटराज प्रतिमापूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. येथील श्रीमंत घोरपडे नाट्यगृहात झालेल्या या स्पर्धांना रसिकांचा चांगला प्रतिसाद लाभला.

# दत्ताजीराव कदम महाविद्यालयात आर्थिक साक्षरता प्रशिक्षण

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

येथील दत्ताजीराव कदम आर्ट सायन्स व कॉमर्स महाविद्यालयातील कॉमर्स व अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक १० ते ११ जानेवारी २०२४ रोजी संपन्न झाला. सदर प्रशिक्षणाचे उद्घाटन मा.प्राचार्य डॉ.एस.एम.मणेर व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले. प्रारंभी दिप्रज्वलन व प्रतिमा पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते झाले. सदर प्रशिक्षणासाठी सेबी संस्थेचे तज्ञ मार्गदर्शक साधक व्यक्ती म्हणून उपस्थित होते. सदर कार्यक्रमात आर्थिक नियोजन व व्यवस्थापन तसेच म्युचल फंड व शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक यासंदर्भात माहिती देण्यात आली. या प्रशिक्षणातून नोकरी व व्यवसायाच्या विविध संधी ,कौशल्य विकास, व्यक्तिमत्व विकास याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवसात स्वागत प्रास्तावित व तज्ञ व्यक्तींची ओळख विभाग प्रमुख प्रा. विजय पाटील यांनी केले कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान मा. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर सर यांनी भूषवले आभार प्राध्यापक डॉ. वर्षा शिंदे यांनी व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीमती जी. एम. डिसोजा यांनी केले कॉमर्स व अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी सदर प्रशिक्षणास उपस्थित होते.

दक्षिण महाराष्ट्र केसरी २४ जानेवारी २०२४/१

# समूहनृत्य स्पर्धेत डीकेएएससी कॉलेज प्रथम

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : येथील मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल यांच्यावतीने आयोजित २४ व्या युवास्पंदन या स्पर्धा उपक्रमाच्या अंतर्गत वैयक्तिक आणि समुहनृत्य या दोन्ही स्पर्धा चुरशीने आणि उत्साहात पार पडल्या. यावेळी समुहनृत्य स्पर्धेत डीकेएएससी कॉलेज इचलकरंजीच्या मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला तर वैयक्तिक नृत्य स्पर्धेत विजय आलासे, पट्टणकोडोली याने प्रथम क्रमांक प्राप्त केला.



इचलकरंजी : युवास्पंदन वैयक्तिक नृत्य स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना विजय आलासे.

समूहनृत्यस्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या मुलांच्या ग्रुपने द्वितीय क्रमांक तर युफोरिया, इचलकरंजी संघाने तृतीय क्रमांक मिळविला. वैयक्तिक नृत्य स्पर्धेत गंधाली पारनाईक (द्वितीय), साक्षी बारवाडे (तृतीय), सिद्धी भस्मे आणि भक्ती सोनटक्के (उत्तेजनार्थ) क्रमांक प्राप्त केले. या स्पर्धात इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली, कराड भागातील स्पर्धकांनी सहभाग घेतला.

रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष नितीनकुमार कस्तुरे, नाट्य परिषद मुंबईचे राजन मुठाणे, कोल्हापूरचे रंगकर्मी संजय दिवाण आणि परीक्षकांच्या हस्ते नटराज प्रतिमापूजन करण्यात आले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण शामसुंदर मर्दा आणि सर्व परीक्षकांच्या हस्ते तसेच प्रा. समीर गोवंडे, सुरेश चौगुले तसेच रंगकर्मी प्रा. मिलिंद दांडेकर आणि नृत्यगुरू सायली होगाडे यांच्या हस्ते पार पडला.

संतोष आबाळे यांनी स्वागत केले तर माजी अध्यक्ष संजय होगाडे यांनी मान्यवरांना गुलाब पुष्प प्रदान केले. नृत्यगुरु मोहिनी दिवाण, इरा बेलापुरे आणि रत्नाकर शेळके यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सूत्रसंचालन अनिरुद्ध दांडेकर, प्रवीण लायकर, कपिल पिसे व सचिन चौधरी यांनी केले. परीक्षकांचा परिचय कादंबरी माळी हिने करून दिला.

CS Scanned with CamScanner

दैनिक महासत्ता
२४ जानेवारी २०२४

# युवास्पंदन समूहनृत्य स्पर्धेत डीकेएएससी कॉलेज प्रथम

इचलकरंजी,ता.२३-

येथील मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या २४व्या युवास्पंदन या स्पर्धा उपक्रमाच्या अंतर्गत वैयक्तिक आणि समूहनृत्य या दोन्ही स्पर्धा चुरशीने आणि उत्साहात पार पडल्या.

यावेळी समुहनृत्य स्पर्धेत डीकेएएससी कॉलेज इचलकरंजीच्या मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला तर वैयक्तीक नृत्य स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजय आलासे, पट्टणकोडोली याने प्राप्त केला.समूहनृत्य स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या मुलांच्या ग्रुपने द्वितीय क्रमांक मिळवला तर युफोरिया,



समूहनृत्य स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रमुख मान्यवरांच्या हस्ते स्विकारताना डीकेएएससी कॉलेज मुलींचा संघ.

इचलकरंजी या संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

वैयक्तीक नृत्य स्पर्धेत गंधाली पारनाईक हिने द्वितीय क्रमांक तर साक्षी बारवाडे हिने तृतीय क्रमांक मिळविला. सिद्धी भस्मे आणि भक्ती सोनटक्के यांनी उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केले. या स्पर्धेमध्ये इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली, कराड भागातील स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धा कार्यक्रमाच्या सुरुवातीला रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष नितीनकुमार कस्तुरे, नाट्य परिषद मुंबईचे तसेच मसाप पुणेचे

## वैयक्तिक नृत्य स्पर्धेत विजय आलासे प्रथम

संचालक राजन मुठाणे, कोल्हापूरचे रंगकर्मी संजय दिवाण आणि परीक्षकांच्या हस्ते नटराज प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मर्दा फौंडेशनचे कार्यकारी विश्वस्त शामसुंदर मर्दा आणि सर्व परीक्षकांच्या हस्ते तसेच मनोरंजन मंडळाचे अध्यक्ष प्रा. समीर गोवंडे, रोटरी क्लब इचलकरंजी सेंट्रलचे सेक्रेटरी सुरेश चौगुले तसेच रंगकर्मी प्रा. मिलिंद दांडेकर आणि नृत्यगुरू सौ. सायली होगाडे यांच्या हस्ते पार पडला.संतोष आबाळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.माजी अध्यक्ष संजय होगाडे यांनी पाहुण्यांना व परीक्षकांना गुलाब पुष्प प्रदान केले. सदरच्या स्पर्धांसाठी कोल्हापुरच्या नृत्यगुरु सौ. मोहिनी दिवाण, सौ. इरा बेलापुरे कराड आणि रत्नाकर शेळके पुणे यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. याप्रसंगी सौ. बेलापुरे यांनी मार्गदर्शन केले.

नृत्य स्पर्धेचे सूत्रसंचालन अनिरुद्ध दांडेकर व प्रवीण लायकर यांनी केले तर समूहनृत्य स्पर्धेचे सूत्रसंचालन कपिल पिसे व सचिन चौधरी यांनी केले. परीक्षकांचा परिचय कादंबरी माळी हिने करून दिला.येथील श्रीमंत घोरपडे नाट्यगृहात झालेल्या या स्पर्धांना इचलकरंजी व परिसरातील रसिकांचा चांगला प्रतिसाद लाभला.

Scanned with CamScanner

सकाळ | गुरुवार, २५ जानेवारी, २०२४

## डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयात समाजशास्त्र विभागातर्फे पदव्युत्तर विभागासाठी नेट, सेट कार्यशाळा झाली. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर अध्यक्षस्थानी होते. कार्यशाळेत पहिल्या पेपरसाठी डॉ. विनोदकुमार कुंभार यांनी परीक्षा पद्धती, परीक्षेमध्ये विचारले जाणारे प्रश्न, परीक्षा स्वरूप व महत्त्वाचे घटक यावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या पेपरसाठी मार्गदर्शक म्हणून प्रा. आकाश ब्राह्मणे, प्रा. अभिजित पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. मयूरेश पाटील यांनी केले. आभार समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्जुन जाधव यांनी मानले.



इचलकरंजी : कार्यशाळेत डॉ. विनोदकुमार कुंभार यांनी मार्गदर्शन केले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत | गुरुवार, २५ जानेवारी २०२४

# राजधानीत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार कोल्हापूर

## प्रजासत्ताक संचलनासाठी कोल्हापुरच्या १४ जणांची निवड :तरुणांमध्ये उत्साह

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

२६ जानेवारीला दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक संचलनात कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. राजधानीत होणाऱ्या मानाच्या संचलनात महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व कोल्हापूर करणार आहे. यंदाच्या प्रजासत्ताक संचलनात कोल्हापुरच्या १४ जणांची संचलनासाठी निवड झाली आहे. दिल्लीत ते महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करताना अखंड देशासह जगभर लाईव्ह दिसणार आहे. सैन्य, पोलीस दलासह संरक्षण क्षेत्रात करियर करु इच्छिणाऱ्या तरुणांमध्ये उत्साह आहे.

शिक्षण, सैन्य, पोलीस, उद्योग, प्रशासकीय सेवाच नव्हे तर सांस्कृतिक क्षेत्रात कोल्हापुरची घोडदौड कायम आहे. कला, क्रीडा क्षेत्रासह दिल्लीतील प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात कोल्हापुरच्या युवकांनी नाव उज्ज्वल अनेक उदाहरणे आहेत. कोल्हापुरातील शाळा–महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची कला, क्रीडा, अविष्कार संशोधनासाठी राष्ट्रीय पातळीवर निवड ही अभिमानाची गोष्ट आहे. पाचवी, आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतही कोल्हापूरचे विद्यार्थी राज्यात अव्वल आहेत. एनसीसी आणि एनएसएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण दिले जाते. कोल्हापुरच्या विद्यार्थ्यांचा महाराष्ट्र गर्ल्स बटालियनमधून संचलनासाठी निवड झाली आहे. त्यांचा स्वागत सोहळा शाळांमधून झाला. तसेच निवड झालेले विद्यार्थी दिल्लीला रवाना झाले आहेत.

### कँपची काठिण्य पातळी पूर्ण केल्यावरच संचलनाची संधी

दिल्लीतील प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या संचलनासाठी कोल्हापुरात तीन तर पुण्याला दोन कँप होतात. त्यातून उत्कृष्ट कँडेटची निवड केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना निवड प्रक्रियेतील काठिण्य पातळी पूर्ण करावी लागते. त्यानंतरच दिल्लीत संचलनाच्या माध्यमातून महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळते.

बालक यादव (एनसीसी अधिकारी)

### संचलनाचा सर्वोच्च आनंद

मला महाराष्ट्राच नेतृत्व करायला मिळाले याचा मला खूप आनंद आहे. कँपच्या माध्यमातून खूप काही शिकायला मिळाले. प्रजासत्ताकदिनी संचलन करण्याचा आयुष्यातील सर्वोच्च आनंद आहे.

-दिव्या टोणपे (कमला कॉलेज, कोल्हापूर)

### कोल्हापुरातून संचनासाठी पात्र ठरलेले विद्यार्थी

- महाराष्ट्र बँटरी एनसीसी कोल्हापूर –महावीर कॉलेज– कृष्णदेव गिरी, एसएम लोहिया हायस्कूल–पार्थ वायचळ.
- ग्रुप ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियनची एनसीसी कोल्हापूर– होलिक्रॉस हायस्कूल – वृदाली हिरवे, कमला कॉलेज– दिव्या टोणपे.
- ग्रुप ५ महाराष्ट्र बटालियनची एनसीसी कोल्हापूर– कॉमर्स कॉलेज–ऋत्विक पाटील, डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिरिंग–सिध्दी राजाध्यक्ष.
- ५६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी कोल्हापूर– जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर –कौशिक चांगले, आकांक्षा राजमाने. आजरा महाविद्यालय आजरा–सानिका पाटील, प्राजक्ता केसरकर, विठ्ठल धडाम. डीकेएएसी कॉलेज इचलकरंजी–आदिती चिकोर्डे, वारणा महाविद्यालय–श्रीहरी माने.
- राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा स्वयंसेवक विवेकानंद कॉलेज–प्रविण जमखंडी.

CS Scanned with CamScanner

सकाळ गुरुवार, २५ जानेवारी, २०२४

# थ्रीडी फॉर्म्युला यशाचा गुरुमंत्र

## डॉ. प्रभावती पाटील : आजरा महाविद्यालयात करिअर विषयी कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

आजरा, ता. २४ : सर्जनशील लेखनामध्ये तर अनेक संधी आहेत. जाहिरात लेखन, ब्लॉग लेखन आणि न्यूज हेडलाईन बनवण्यासारख्या नव्या क्षमता विकसित केल्या पाहिजेत. यासाठी प्रयत्नशील राहिल्यास करिअरची नवीन संधी मिळू शकते. या नव्या करिअर वाटांसाठी डेटरमीनेशन, डेडिकेशन आणि डेस्टिनेशन हा थ्री-डी फॉर्म्युला हाच यशाचा गुरुमंत्र आहे, असे प्रतिपादन इचलकरंजीतील डीकेएएससी महाविद्यालयाच्या डॉ. प्रभावती पाटील यांनी केले.



आजरा : येथील आजरा महाविद्यालयात मार्गदर्शन करताना डॉ. प्रभावती पाटील.

आजरा महाविद्यालयामध्ये एक दिवसाची कार्यशाळा झाली. डॉ. पाटील यांनी संसाधन व्यक्ती म्हणून व्याख्यान दिले. प्राचार्य डॉ. अशोक सादळे अध्यक्षस्थानी होते. शिवाजी विद्यापीठ, लीड कॉलेज अंतर्गत यशवंतराव चव्हाण कॉलेज, हलकर्णी क्लस्टरमार्फत आजरा महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाने 'क्रिएटिव्ह रायटींग: न्यू ट्रेंड्स अँड करिअर्स' या विषयावर कार्यशाळा झाली. संसाधन व्यक्ती प्रा. डॉ. आय. आर. जरळी यांनी सैद्धांतिक मांडणी करताना सर्जनात्मक लेखनाचे विविध प्रकार अधोरेखित करीत या क्षमतेचे स्वरूप युनिक असल्याचे नमूद केले.

प्राचार्य डॉ. सादळे यांनी हा नवा विषय विद्यार्थ्यांना नवे रोजगार दालन उघडून देणार असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. उपप्राचार्य प्रा. दिलीप संकपाळ, लीड कॉलेज समन्वयक डॉ. मल्हारराव ढोंबरे, डॉ. अशोक बाचुळकर, डॉ. आप्पासाहेब बुडके, प्रा. अलका मुंगुर्डेकर, प्रा. अनुराधा गोटखिंडे, प्रा. बाळासाहेब कांबळे, प्रा. संदीप देसाई आदिंनी कार्यशाळेत सहभाग घेतला. आजरा महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा. रमेश चव्हाण यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. इंग्रजी विभागाच्या निसबाह, सिद्धी, मिसबाह आणि सदफ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सलमा मणेर यांनी कार्यशाळेची तांत्रिक बाजू सांभाळली. प्रा शेखर शिउडकर यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

सकाळ, मंगळवार, ३० जानेवारी, २०२४

# 'डीकेएएससी' महाविद्यालयात रक्तदान शिबिर

इचलकरंजी : 'डीकेएएससी' महाविद्यालयात रक्तदान शिबिर घेतले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त संजीवन ब्लड सेंटर, कोल्हापूर यांच्या सहकार्याने शिबिर झाले. प्राचार्य डॉ. मणेर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. शिबिरात ६१ जणांनी रक्तदान केले. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ , गुरुवार, १ फेब्रुवारी, २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत व्याख्याते अमित गर्जे व विकास टारे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर.

## डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात 'सेंद्रिय शेती : शाश्वत कृषी विकासाची गरज' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत भूगोलशास्त्र विभागातर्फे आयोजन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. विकास टारे यांनी सेंद्रिय खते, कीटकनाशके, संजीवके तयार करण्याच्या शास्त्रीय पद्धती समजावून सांगितल्या. अमित गर्जे यांनी रासायनिक आणि सेंद्रिय शेती यांची तुलना करून दोन्हींचे फायदे-तोटे याविषयी माहिती दिली. सेंद्रिय शेती विषयीची भित्तीपत्रके विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे तयार करून प्रदर्शित केली. समन्वयक प्रा. डॉ. पी. के. वाघमारे यांनी अग्रणी महाविद्यालयच्या उपक्रमाची रूपरेषा मांडली.

CS Scanned with CamScanner

लोकमत ★ epaper.lokmat.com
गुरुवार, दि. ८ फेब्रुवारी २०२४

# 'डीकेएएससी'मध्ये कार्यशाळा उत्साहात

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात 'जाहिरात कौशल्यांचा विकास' या विषयावर कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य एस. एम. मणेर होते. यावेळी डॉ. कल्पना गंगातीरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी जाहिरात कौशल्य विकसित करण्यासाठी सर्जनशीलतेची गरज असते, असे मत व्यक्त केले. डॉ. सुनीता वेल्हाळ यांनी स्वागत केले. प्रभा पाटील यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेत ७५ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ, शुक्रवार, ९ फेब्रुवारी, २०२४

## 'डीकेएएससी'मध्ये मिनी प्रोजेक्ट स्पर्धा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स विभागात मिनी प्रोजेक्ट स्पर्धा झाली. उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्याहस्ते झाले. डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. व्ही. व्ही. गणबावले, डॉ. एस. टी. सुतार यांची उपस्थिती होती. परीक्षक म्हणून प्रा. सौरभ मोरे व प्रा. पठाण यांनी काम पाहिले.

CS Scanned with CamScanner

सकाळ, सोमवार, १२ फेब्रुवारी, २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात 'जाहिरात कौशल्यांचा विकास' या विषयावर आयोजित कार्यशाळेत डॉ. कल्पना गंगातीरकर यांनी मार्गदर्शन केले.

## डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

**इचलकरंजी :** अग्रणी महाविद्यालय क्लस्टर योजनेअंतर्गत इंग्रजी विभागातर्फे डीकेएएससी महाविद्यालयात 'जाहिरात कौशल्यांचा विकास' या विषयावर कार्यशाळा झाली. प्रमुख पाहुण्या डॉ. कल्पना गंगातीरकर यांनी जाहिरात कौशल्य विकसित करण्यासाठी सृजनशीलतेची गरज असते, असे मत व्यक्त केले. प्राचार्य एस. एम. मणेर यांनी, सध्याचे युग हे जाहिरातीचे युग असून याबाबतची कौशल्ये आत्मसात करून विकसित करण्यासाठी अशा कार्यशाळेची गरज असल्याचे सांगितले. समारोप सत्रामध्ये डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव यांची उपस्थिती होती. अग्रणी महाविद्यालय प्रमुख डॉ. पद्मश्री वाघमारे यांनी सहकार्य केले. इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सुनीता वेल्हाळ, डॉ. प्रभा पाटील, प्रा. संदीप हरगाणे, प्रा. दीपक देवकर, प्रा. अर्चना नंदगावे, प्रा. श्रद्धा बरगाले आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ, शुक्रवार, १६ फेब्रुवारी, २०२४

# 'डीकेएएससी' विद्यार्थ्यांची भेट

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने नवचैतन्य बालगृहास भेट दिली. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या मार्गदर्शनाखाली भेटीचे आयोजन केले. बालगृहातील बालकांना शालोपयोगी वस्तूंचे व फळांचे वाटप केले. विद्यार्थ्यांसाठी कलागुणांचे प्रदर्शन करत उपक्रम घेतला. प्रा. डी. ए. यादव, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. के. वाघमारे उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार १९ फेब्रुवारी २०२४

# विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर छंद जोपासायला हवा

## कवी प्रा. डॉ. विनायक पवार : डीकेएएससीमध्ये पारितोषिक वितरण

प्रतिनिधी
इचलकरंजी

महाविद्यालयीन जीवनाचे हे सोनेरी दिवस प्रत्येकाच्या वाट्याला परत येत नाहीत. चांगल्या करिअरची स्वप्ने उरात ठेवून अभ्यास करत करत हे दिवस आनंदाने जगायला हवेत. अभ्यासाबरोबर एखादी कला, एखादा छंद जोपासायला हवा. चांगली पुस्तके वाचायला हवीत, असे मत गीतकार, कवी प्रा. डॉ विनायक पवार यांनी व्यक्त केले.



इचलकरंजी : डीकेएएससीच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात बोलताना प्रा. डॉ. विनायक पवार. समवेत प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर व मान्यवर.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी, ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. यशस्वी खेळाडूंचा, गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. डॉ. पवार यांनी कविता, चित्रपटगीते आणि अनुभव कथनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

अभ्यासाबरोबर सर्व क्षेत्रात महाविद्यालयाने शहराचे व संस्थेचे नाव उज्वल केले आहे. आम्हाला आमच्या विद्यार्थ्यांचा अभिमान वाटतो, असे प्राचार्य मणेर यांनी गौरवोद्गार काढले. शेलापागोटे वाचनाचा कार्यक्रम झाला. कार्याध्यक्ष डॉ. डी. सी. कांबळे यांनी अहवाल, प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रा. विनायक भोई यांनी जिमखाना अहवाल वाचन केले. विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार सादर केले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. आभार प्रा. डी. ए. यादव, सूत्रसंचालन प्रा. अतिश पाटील, प्रा. रोहित शिंगे, डॉ. केतकी पाटील यांनी केले.

CS Scanned with CamScanner

लोकमत ★ epaper.lokmat.com
सोमवार, दि. १९ फेब्रुवारी २०२४

## अब्दुललाटला विशेष श्रमसंस्कार शिबिर

अब्दुललाट : दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स व कॉमर्स कॉलेजच्या वतीने २० फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारीपर्यंत विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित केले आहे. मंगळवारी (दि.२०) उद्घाटन होणार असून, सरपंच कस्तुरी कुरुंदवाडे हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे डॉ.टी.एम. चौगुले यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. बुधवारी (दि.२१) रोहित दळवी यांचे 'अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावर व्याख्यान, त्यानंतर पथनाट्य होईल. शुक्रवारी (दि.२३) अनिल जांभळे यांचे 'संत गाडगेबाबा' या विषयावर व्याख्यान, शनिवारी (दि.२४) दिनकर कांबळे यांचे 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. रविवारी (दि.२५) नेत्र तपासणी शिबिर व उदय पाटील यांचे 'मोबाइलचे मायाजाल' या विषयावर व्याख्यान होणार आहे. सोमवारी (दि.२६) समारोप होणार आहे.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शुक्रवार २३ फेब्रुवारी २०२४

# डीकेएएससीच्या आदिती चिकोर्डेचे जंगी स्वागत

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाची विद्यार्थीनी, एनसीसी कॅडेट आदिती चिकोर्डे हिचे इचलकरंजी शहरात जंगी स्वागत करण्यात आले. २६ जानेवारी २०२४ रोजी दिल्ली येथील कर्तव्यपथावर पार पडलेल्या संचलनात एनसीसी पथकामध्ये आदितीचा सहभाग होता.



२०१४ पासुन प्रत्येक वर्षी दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनाच्या संचलनामध्ये एनसीसी कॅडेट सहभागी असण्याची महाविद्यालयाची परंपरा आदिती चिकोर्डे हिने याही वर्षी कायम ठेवली. इचलकरंजीचे पोलीस उपाधीक्षक समीरसिंह साळवे यांच्या हस्ते आणि प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, प्रा. मेजर मोहन वीरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आदितीचा सन्मान करण्यात आला.

यावेळी शहरातील शिवतीर्थावरील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन करून शिवतीर्थ ते महाविद्यालयापर्यंत वाजतगाजत आणि फटाक्यांच्या आतषबाजीत तीची स्वागत फेरी काढण्यात आली. महाविद्यालयात तिचे जंगी स्वागत करण्यात आले.

पोलीस उपाधीक्षक समीरसिंह साळवे म्हणाले, एनसीसीच्या माध्यमातून आत्मसात केलेली शिस्त आपल्याला संपूर्ण जगण्यात महत्त्वाची ठरते. प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात सहभागी होण्यासाठी आदितीने घेतलेले कष्ट, तिची जिद्द महत्वाची ठरली. इतर एनसीसी कॅडेटनीही तिची प्रेरणा घेऊन ही परंपरा कायम ठेवावी. प्राचार्य डॉ. मणेर म्हणाले, आमचे विद्यार्थी नेहमीच विविध क्षेत्रात चमकदार कामगिरी करत आहेत. आम्हाला आमच्या विद्यार्थ्यांचा अभिमान वाटतो. महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत राहिल. एनसीसी प्रमुख प्रा. विनायक भोई यांच्या नियोजनाखाली झालेल्या या कार्यक्रमास महापालिकेचे नगरसचिव विजय राजापुरे, दशरथ माने, डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. राहुल बुणांद्रे, प्रा. वसीमराज मुल्लाणी यांची विशेष उपस्थिती होती. गोविंदराव हायस्कूल, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे हायस्कूलच्या एनसीसी कॅडेटनी या उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
शनिवार, २४ फेब्रुवारी, २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजच्या वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण सोहळ्यात पारितोषिकप्राप्त खेळाडूंसमवेत प्रा. डॉ. विनायक पवार, प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, आदी.

# डीकेएएससी महाविद्यालयात क्रीडा पारितोषिक वितरण

इचलकरंजी, ता. २३ : 'महाविद्यालयीन जीवनाचे सोनेरी दिवस प्रत्येकाच्या वाट्याला पुन्हा पुन्हा येत नाहीत. चांगल्या करिअरची स्वप्ने बाळगून अभ्यास करत करत हे दिवस आनंदाने जगायला शिका. अभ्यासाबरोबर एखादी कला, एखादा छंद जोपासायला हवा. चांगली पुस्तके वाचा,' असा मूलमंत्र प्रसिद्ध गीतकार, कवी प्रा. डॉ. विनायक पवार यांनी विद्यार्थ्यांना दिला.

येथील डीकेएएससी महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. समारंभात महाविद्यालयातील सर्व यशस्वी खेळाडूंचा, गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. प्राचार्य डॉ. मणेर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. डी. सी. कांबळे यांनी महाविद्यालयाचा सर्वसाधारण अहवाल, तर प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रा. विनायक भोई यांनी जिमखाना विभागाचे अहवालवाचन केले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. अतीश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. ए. यादव यांनी आभार मानले.

CamScanner

सकाळ , सोमवार, २६ फेब्रुवारी, २०२४



इचलकरंजी : नाईट कॉलेज व डिकेएएससी कॉलेजमध्ये सामंजस्य करार केला.

# नाईट कॉलेज– 'डिकेएएससी'मध्ये करार

**इचलकरंजी :** नाईट कॉलेज व डिकेएएससी कॉलेजमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. दोन शैक्षणिक संस्थांमध्ये महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग यांच्या निर्देशानुसार नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार समाजशास्त्र विभागाअंतर्गत सामंजस्य करार केला. याअंतर्गत दोन्ही शैक्षणिक संस्थांमध्ये चर्चासत्र, व्याख्यान, कार्यशाळा, सेमिनार, क्षेत्र कार्यभेट, अभ्यास सहल अशा शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. नाईट कॉलेजचे प्राचार्य डॉ. पुरंदर नारे, डिकेएएससी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अर्जुन जाधव, नाईट कॉलेजमधील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. अभिजित पाटील, प्रा. विनायक गणबावले, प्रा. मयुरेश पाटील आदी उपस्थितहोते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार २६ फेब्रुवारी २०२४

# नाईट कॉलेज – डिकेएएससी कॉलेजमध्ये सामंजस्य करार

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

येथील खजिरे शिक्षण संस्थेचे नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी या दोन शैक्षणिक संस्थांमध्ये महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग यांच्या निर्देशानुसार व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला अनुसरून समाजशास्त्र विषय विभागाअंतर्गत सामंजस्य करार करण्यात आला.

करारा अंतर्गत दोन्ही शैक्षणिक संस्थांमध्ये समाजशास्त्र विभागांतर्गत चर्चासत्र, व्याख्यान, कार्यशाळा, सेमिनार, क्षेत्र कार्य भेट, अभ्यास सहल अशा शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. यावेळी नाईट कॉलेजचे प्राचार्य डॉ. पुरंदर नारे, डिकेएएससी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस एम मणेर, समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अर्जुन जाधव, नाईट कॉलेजमधील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. अभिजीत पाटील, प्रा. विनायक गणबावले, प्रा. मयूरेश पाटील उपस्थित होते.



इचलकरंजी : नाईट कॉलेज व डीकेएएससी कॉलेजमध्ये सामंजस्य करारा-वेळी प्राचार्य डॉ. पुरंदर नारे, प्राचार्य डॉ. एस एम मणेर, प्रा. डॉ. अर्जुन जाधव, प्रा. अभिजीत पाटील, प्रा. विनायक गणबावले, प्रा. मयूरेश पाटील.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र केसरी
२६ फेब्रुवारी २०२४/६



इचलकरंजी : नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स व दत्ताजीराव कदम कॉलेज यांच्यात सामंजस्य करारावेळी डॉ. पुरंदर नारे, डॉ. एस एम मणेर, डॉ. अर्जुन जाधव आदी.

# नाईट कॉलेज व डिकेएएससी कॉलेजमध्ये सामंजस्य करार

केसरीवृत्तसेवा

इचलकरंजी : देशभक्त बाबासाहेब भाऊसाहेब खंजिरे शिक्षण संस्थेचे नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी या दोन शैक्षणिक संस्थांमध्ये महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग यांच्या निर्देशानुसार व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला अनुसरून समाजशास्त्र विषय विभागाअंतर्गत सामंजस्य करार (चेण) करण्यात आला. सदर करारा अंतर्गत दोन्ही शैक्षणिक संस्थांमध्ये समाजशास्त्र विषय विभागा अंतर्गत चर्चासत्र, व्याख्यान, वर्कशॉप, सेमिनार, क्षेत्र कार्य भेट, अभ्यास सहल अशा शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. यावेळी नाईट कॉलेजचे प्राचार्य डॉ. पुरंदर नारे, प्राचार्य डॉ. एस एम मणेर, प्रा. डॉ. अर्जुन जाधव, प्रा. अभिजीत पाटील, प्रा. विनायक गणबावले, प्रा. मयूरेश पाटील उपस्थित होते

CS Scanned with CamScanner

# नाईट कॉलेज, डिकेएएससी कॉलेजमध्ये सामंजस्य करार

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

येथील देशभक्त बाबासाहेब भाऊसाहेब खंजिरे शिक्षण संस्थेचे नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी या दोन शैक्षणिक संस्थांमध्ये महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग यांच्या निर्देशानुसार व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून समाजशास्त्र विषय विभागाअंतर्गत सामंजस्य करार करण्यात आला.

सदर करारा अंतर्गत दोन्ही शैक्षणिक संस्थांमध्ये समाजशास्त्र विभागा अंतर्गत चर्चासत्र, व्याख्यान, कार्यशाळा, सेमिनार, क्षेत्र कार्य भेट, अभ्यास सहल अशा शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. यावेळी नाईट कॉलेजचे प्राचार्य डॉ. पुरंदर नारे, डिकेएएससी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस.एम.मणेर, समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ.अर्जुन जाधव, नाईट कॉलेज मधील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. अभिजीत पाटील, प्रा. विनायक गणबावले, प्रा. मयूरेश पाटील उपस्थित होते.

सकाळ

# ग्रामविकासातून विकसित भारत

## डॉ. चौगुले : अब्दुललाटला 'डीकेएएससी'चे शिबिर

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. २५ : विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा, श्रमसंस्काराची भावना श्रमसंस्कार शिबिरातूनच घडत असते. स्वच्छतेकडून समृद्धीकडे जाताना राष्ट्रीय सेवा योजनेच्या ग्रामविकासातून विकसित भारत घडेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजना शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे संचालक, डॉ. टी. एम. चौगुले यांनी केले.



**अब्दुललाट :** डीकेएएससी कॉलेजच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटनप्रसगी डॉ. टी. एम. चौगुले यांनी मार्गदर्शन केले.

डीकेएएससी कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीराचे उद्‌घाटन अब्दुललाट (ता. शिरोळ) येथे झाले. स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी संस्कार आणि शिस्तीची पाठशाला या शिबिरातून घडत असते. महाविद्यालयीन जीवन जगत असताना विद्यार्थ्यांनी एकसंध होऊन कार्य करण्याची वृत्ती जोपासली जावी, असा विश्वास व्यक्त केला. सरपंच कस्तुरे कुरुंदवाडे, उपसरपंच ज्ञानेश्वर नावरे, ग्रामविकास अधिकारी विजयसिंग रजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिबिरात ग्रामस्वच्छता, निर्मल ग्राम अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन, पर्यावरण संवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, नेत्र तपासणी, मतदान जनजागृती आदी उपक्रम होणार आहेत. प्रा. डी. ए. यादव, प्रा. दत्तकुमार मुंगारे, प्रा. विशाल कांबळे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. अरुण कटकोळे यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. पद्मश्री वाघमारे यांनी केली. सूत्रसंचालन संजीवनी कदम हिने केले. आभार प्रा. वैशाली ढोबळे यांनी मानले.

Kolhapur, Kopjillha
26/02/2024 Page No. 2

पुढारी शनिवार, २ मार्च २०२४

# डीकेएएससी महाविद्यालयात अभ्यासगत व्याख्यान

**इचलकरंजी : पुढारी वृत्तसेवा**

येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या वतीने एम. ए. हिंदीच्या विद्यार्थ्यांसाठी पाठ्यक्रमावर आधारित अभ्यासगत व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानासाठी प्रा. डॉ. छाया माळी उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना विशेष रचनाकार : कमलेश्वर या विषयावर साहित्यकार कमलेश्वर यांचा जीवन परिचय व त्यांच्या साहित्याची सखोल माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. हिंदी विभागप्रमुख डॉ. अंजली उबाळे यांनी स्वागत केले. प्रा. अर्चना तराळ यांनी सूत्रसंचालन केले. शिवप्रसाद निषाद याने आभार मानले.

सकाळ , सोमवार, ४ मार्च २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातील तुषार शेटके याचा कंपनी सेक्रेटरी इंटर परीक्षेत यश मिळवल्याबद्दल सत्कार केला.

## तुषार शेटकेचे यश

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातील तुषार शेटके याने कंपनी सेक्रेटरी इंटर परीक्षेत यश मिळविले. बी.कॉम. भाग-३ मधील शेटके याने पहिल्याच प्रयत्नात यश प्राप्त केले. शहरातील एकमेव विद्यार्थी परीक्षेसाठी पात्र ठरला आहे. त्याचा प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते सत्कार केला. त्याला विजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner



# मेहनती तुषार शेटके याचे कंपनी सेक्रेटरी (सीएस) इंटर परीक्षेत यश

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

येथील डी.के.ए. एस.सी महाविद्यालयातील बी.कॉम भाग तीन चा विद्यार्थी कु तुषार शेटके ह्याने नुकत्याच पार पडलेल्या कंपनी सेक्रेटरी (सीएस) इंटर परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश प्राप्त केले आहे. देशातील निकाल ११.४७% लागला असून तो इचलकरंजी शहरातील एकमेव विद्यार्थी ह्या परीक्षेसाठी पात्र ठरला आहे . तुषार शेटके हा तिळवणी येथील सामान्य कुटुंबातील असून कौटुंबिक पार्श्वभूमी श्रमिक स्वरूपाची आहे . तो स्वतः अर्धवेळ कार्यालयीन काम स्वदेशी मिल मध्ये वडीलांसमवेत करतो. प्राचार्य डॉ. एस एम मणेर यांच्या हस्ते त्याचे अभिनंदन करण्यात आले. ह्या यशासाठी त्यांने आनंद व्यक्त करून महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

पुढारी

मंगळवार, ५ मार्च २०२४

## डीकेएएससी महाविद्यालयात मार्गदर्शनपर व्याख्यान

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या वतीने बी.ए. व एम.ए. हिंदीच्या विद्यार्थ्यांसाठी सेट-नेट परीक्षा मार्गदर्शन व्याख्यान पार पडले. डॉ. आरिफ महात यांनी विद्यार्थ्यांना सेट-नेट परीक्षेविषयीच्या दोन्ही पेपरचा पाठ्यक्रम समजावून सांगितला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. हिंदी विभागप्रमुख डॉ. अंजली उबाळे यांनी स्वागत केले. प्रा. अर्चना तराळ यांनी सूत्रसंचालन केले. सनोफर नायकवडी यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

पुढारी

शनिवार, ९ मार्च २०२४

# डीकेएएससी महाविद्यालयाची सातारा ग्रंथालयास भेट

**इचलकरंजी : पुढारी वृत्तसेवा**

येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या वतीने महादेवी वर्मा ग्रंथालय सातारा या ठिकाणी भेटीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथ व वाचन संस्कृतीचे महत्त्व जोपासण्याच्या उद्देशाने या भेटीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयास भेट देऊन हिंदीच्या समृद्ध ग्रंथसंपदे विषयीची सखोल माहिती ग्रंथालयाचे सहकार्यवाह नारायण शिंदे यांच्याकडून घेतली. या ग्रंथ भेटीसाठी ग्रंथालयाचे कार्यवाह ता. का. सूर्यवंशी, व्यवस्थापक नवनाथ शिंदे व ग्रंथपाल धोंडिबा खरात यांचे सहकार्य लाभले. शिवसागर निषाद याने ग्रंथालय भेटीविषयीचे आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. अंजली उबाळे यांनी आभार मानले. प्रा. अर्चना तराळ यांनी ग्रंथालय भेटीचे नियोजन केले. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
९ मार्च २०२४/७

# कुसुमाग्रजांच्या साहित्यलेखनाने मराठी भाषा समृद्ध : डॉ. एस. एम. मणेर

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी** : वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, आणि भालचंद्र नेमाडे यांसारख्या ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या साहित्यिकांसह सर्वच साहित्यिकांनी मराठी भाषेत दिलेले योगदान पाहता आज जगाने दखल घ्यावी असे समृद्ध वाङ्मय मराठी भाषेत आहे. त्यांच्यामुळे मराठी भाषा समृध्द झाली असे मत प्राचार्य. डॉ. एस. एम. मणेर यांनी व्यक्त केले.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी मध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात झाला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मणेर उपस्थित होते. यावेळी डॉ. मणेर म्हणाले, सध्याच्या जगात इंग्रजी ही व्यवहाराची भाषा असली तरी मराठी ही आपल्याला समृद्ध करणारी भाषा आहे. प्रास्ताविक प्रा. संजय सुतार यांनी केले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. सुनीता वेल्हाळ यांची उपस्थिती होती. आभार प्रा. भारती कोळेकर यांनी मानले.

Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र केसरी

१२ मार्च २०२४/६

# डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची ग्रंथालयास भेट

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या वतीने महादेवी वर्मा ग्रंथालय सातारा या ठिकाणी भेटीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयास भेट देऊन हिंदीच्या समृद्ध ग्रंथसंपदे विषयीची सखोल माहिती ग्रंथालयाचे सहकार्यवाह नारायण शिंदे यांच्याकडून करून घेतली.

ते म्हणाले, सातारा येथील महादेवी वर्मा ग्रंथालय हे पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव हिंदीचे ग्रंथालय असून ते सन २०१२ पासून हिंदीच्या विकास प्रसार व प्रचारामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. या ग्रंथ भेटीकरिता ग्रंथालयाचे कार्यवाह ता. का. सूर्यवंशी, व्यवस्थापक नवनाथ शिंदे व ग्रंथपाल धोंडीबा खरात यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शिवसागर निषाद याने ग्रंथालय भेटीविषयीचे आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. अर्चना तराळ यांनी ग्रंथालय भेटीचे नियोजन केले. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या मार्गदर्शनाखाली या भेटीचे आयोजन केले होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत गुरुवार १४ मार्च २०२४



इचलकरंजी : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग, कयाकिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात प्रिया चव्हाण, प्रणाली कोपर्डे यांची निवड झाल्याबद्दल प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी सत्कार केला.

# डीकेएएससीच्या खेळाडूंची कयाकिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड

इचलकरंजी : विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित डि. के. ए. एस. सी. कॉलेजच्या खेळाडू प्रिया मारुती चव्हाण व प्रणाली प्रमोद कोपार्डे यांची पंजाब युनिव्हर्सिटी, पटियाला येथे १९ ते २२ मार्च दरम्यान येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग स्पर्धेसाठी शिवाजी संघात निवड झाली आहे. प्रिया चव्हाण हिने सांगली येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय कनोईंग स्पर्धेत सी १ – २०० मी. व ५०० मी. प्रकारात सुवर्ण पदक पटकावले होते. प्रणाली कोपार्डे हिने कयाकिंग स्पर्धेत सी १ – २०० मी. व ५०० मी. प्रकारात सुवर्ण पदक पटकाविले होते. या दोन्ही खेळाडू गणेश बरगाले यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. खेळाडूंचा सत्कार प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी केला व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई व प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
१४ मार्च २०२४/११



प्रिया चव्हाण व प्रणाली कोपार्डे यांचा निवडीनंतर सत्कार करण्यात आला.

# डीकेएएससी च्या खेळाडूंची आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित डी. के. ए. एस. सी. कॉलेज इचलकरंजीच्या खेळाडू प्रिया चव्हाण व प्रणाली कोपार्डे यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग स्पर्धेसाठी शिवाजी संघात निवड झाली आहे. या स्पर्धा पंजाब युनिव्हर्सिटी, पटियाला येथे दि. १९ ते २२ मार्च २०२४ दरम्यान येथे होणार आहेत. प्रिया चव्हाण हीने सांगली येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय कनोईंग स्पर्धेत C१– २०० मी. व ५०० मी. प्रकारात सुवर्ण पदक पटकवले होते. तर प्रणाली कोपार्डे हिने कयाकिंग स्पर्धेत K१– २०० मी. व ५०० मी. प्रकारात सुवर्ण पदक पटकाविले होते. यांना गणेश बरगाले यांचे मार्गदर्शन मिळाले. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. तसेच शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई व प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

# १४ संशोधन पेपर, आठ प्रकल्पांना पेटंट, आता ठरल्या सुवर्णपदकाच्या मानकरी

## 'डीवायपी' ग्रुपतर्फे डॉ. प्रीती बागवडेंचा सन्मान : आज होणार गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : लहानपणापासूनच चिकित्सा, उत्सुकतेची सवय असल्याने पुढे जाऊन संशोधनात आवड निर्माण करणाऱ्या



इचलकरंजी येथील डॉ. प्रा. प्रीती प्रकाश बागवडे यांना डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे सुवर्णपदक जाहीर झाले आहे. आतापर्यंत १४ संशोधन पेपर सादर करताना त्यांच्या आठ संशोधन प्रकल्पांना भारतीय पेटंटही जाहीर झाले आहे.

मूळच्या इचलकरंजी येथील असलेल्या प्रीती यांनी डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेजच्या सीआयआर विभागात प्रा.डॉ. सी. डी. लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली रिसर्च सुरू केला. त्यांनी 'रिड्युसड ग्राफीन ऑक्साईड-कोबाल्ट टंगस्टन ऑक्साईड कांपोजीट इन फिल्म फॉर सुपरकॅपॅसिटर अॅण्ड ओईआर' या विषयावर प्रबंध सादर करत पीएच.डी. मिळवली.इचलकरंजीतील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्य अॅण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये सहायक प्राध्यापक असणाऱ्या डॉ. बागवडे यांनी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण इचलकरंजीत घेतले. दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेजमधूनच त्यांनी बी.एस्सी. केले ज्या कॉलेजमध्ये शिक्षण घेतले, तेथेच ज्ञानदान करण्याचा आनंद वेगळा असल्याची भावना डॉ. बागवडे यांनी 'लोकमत'शी बोलताना व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठातून फिजिक्समधून त्यांनी एम.एस्सी. पूर्ण केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, गुरुवार, २८ मार्च, २०२४



इचलकरंजी : कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल प्रिया चव्हाण, प्रणाली कोपार्डे यांचा सत्कार प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी केला.

# प्रिया चव्हाण, प्रणाली कोपार्डे यांची विद्यापीठ संघात निवड

सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. २७ : डीकेएएससी महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली.

प्रिया चव्हाण व प्रणाली कोपार्डे अशी त्यांची नावे आहेत. स्पर्धा पंजाब युनिव्हर्सिटी, पटियाला येथे होतील. प्रिया चव्हाणने सांगलीतील आंतरविभागीय कनोईंग स्पर्धेत सी १ - २०० मी., ५०० मी. प्रकारात सुवर्णपदक पटकावले. प्रणाली कोपार्डे हिने कयाकिंग स्पर्धेत के१-२०० मी., ५०० मी. प्रकारात सुवर्णपदक मिळवले. सत्कार प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी केला. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई व प्रा. प्रशांत कांबळे, गणेश बरगाले यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
८ एप्रिल २०२४/९

# डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयाच्या स्वप्नजीत मुळीक यांना दोन पेटंट

## नॅनो समिश्रे आधारित ऊर्जा साठवणुकविषयक संशोधन

**केसरी वृत्तसेवा**

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र आधिविभागातील सहाय्यक प्रा. स्वप्नजीत मुळीक यांच्या नॅनो समिश्रे आधारित सुपर कॅपॅसिटर मधील कॅथोडमटेरियलसाठी जर्मन व भारतीय अशी दोनपेटंट प्राप्त झाली आहेत.

या उपकरणांसाठी निकेल कोबाल्टाइट, कोबाल्ट ऑक्साईड आणि पोरस कार्बनचा वापर करण्यात आला असून या नॅनो संमिश्रामुळे या उपकरणाची कार्यक्षमता विकसित होणार आहे. या संशोधनातून ऊर्जा क्षेत्रात नाविन्यपूर्ण बदल घडून येईल. या संशोधनाचा लाभ ऊर्जा क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संशोधकांसह समाजातील ऊर्जेच्या समस्यावर उपाय म्हणून ही होणार आहे. तसेच या संशोधनाच्या मध्यमातून तयार करण्यात येणारी उपकरणे ऊर्जा क्षेत्रासाठी अनमोल देणगी देणारी ठरतील असा विश्वास प्रा. मुळीक यांनी व्यक्त केला. या संशोधनासाठी डॉ. सागर डेळेकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी या महत्वपूर्ण संशोधनाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, डॉ.अनिता धारे, डॉ. दिपक कुंभार उपस्थित होते.



इचलकरंजी : स्वप्नजीत मुळीक यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. अनिता धारे आदी.

Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार ८ एप्रिल २०२४

# प्रा. स्वप्नजीत मुळीक यांना जर्मन, भारतीय पेटंट

## नॅनो संमिश्रे आधारित ऊर्जा साठवणुकविषयक संशोधन

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र आधिविभागातील सहाय्यक प्राध्यापक स्वप्नजीत मुळीक यांच्या नॅनो संमिश्रे आधारित सुपरकॅपॅसिटर मधील कॅथोडमटेरियलसाठी जर्मन व भारतीय अशी दोन पेटंट प्राप्त झाली आहेत. या उपकरणांसाठी निकेल कोबाल्टाइट, कोबाल्ट ऑक्साईड आणि पोरस कार्बनचा वापर करण्यात आला असून या नॅनो संमिश्रामुळे या



इचलकरंजी : प्रा. स्वप्नजीत मुळीक यांना पेटंट मिळाल्याबद्दल सत्कार करताना प्राचार्या डॉ. एस. एम. मणेरे व मान्यवर.

उपकरणाची कार्यक्षमता विकसित होणार असून या संशोधनातून ऊर्जा क्षेत्रात नाविन्यपूर्ण बदल घडून येईल. या संशोधनाचा लाभ ऊर्जा क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संशोधकांसह समाजातील ऊर्जेच्या समस्यावर उपाय म्हणून ही होणार आहे. तसेच या संशोधनाच्या मध्यामातून तयार करण्यात येणारी उपकरणे ऊर्जा क्षेत्रासाठी अनमोल देणगी देणारी ठरतील, असा विश्वास प्रा. मुळीक यांनी व्यक्त केला. या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रा. डॉ. सागर डेळेकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अनिता घारे, प्रा. डॉ. दिपक कुंभार, प्राध्यापक उपस्थित होते.

Scanned with CamScanner



# प्रा.स्वप्नजीत मुळीक यांना जर्मन, भारतीय पेटंट

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र आधिविभागातील सहाय्यक प्राध्यापक स्वप्नजीत मुळीक यांच्या नॅनो समिश्रे आधारित सुपरकॅपॅसिटर मधील कॅथोडमटेरियल साठी जर्मन व भारतीय अशी दोनपेटंट प्राप्त झाली आहेत.

या उपकरणांसाठी निकेल कोबाल्टाइट, कोबाल्ट ऑक्साईड आणि पोरस कार्बनचा वापर करण्यात आला असून या नॅनो संमिश्रामुळे या उपकरणाची कार्यक्षमता विकसित होणार असून या संशोधनातून ऊर्जा क्षेत्रात नाविन्यपूर्ण बदल घडून येईल. या संशोधनाचा लाभ ऊर्जा क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संशोधकांसह समाजातील ऊर्जेच्या समस्यावर उपाय म्हणून ही होणार आहे. तसेच या संशोधनाच्या मध्यामातून तयार करण्यात येणारी उपकरणे ऊर्जा क्षेत्रासाठी अनमोल देणगी देणारी ठरतील असा विश्वास प्रा. मुळीक यांनी व्यक्त केला. या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रा. डॉ. सागर डेळेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी या महत्वपूर्ण संशोधनाबद्दल त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.अनिता घारे, प्रा. डॉ. दिपक कुंभार यांच्यासह प्राध्यापक बंधू भगिनी उपस्थित होते.

तरुण भारत सोमवार, ६ मे २०२४



इचलकरंजी : प्रा. दामोदर सुतार यांना पी. एचडी मिळाल्याबद्दल सत्कार करताना प्राचार्य. डॉ. एस. एम. मणेर, डॉ. अनिता घारे, डॉ. दिपक कुंभार, डॉ. स्वप्नजित मुळीक, प्रा. रामदास भरसाट.

# डॉक्टरेट प्राप्त प्रा. दामोदर सुतार यांचा एएससी महाविद्यालयात सत्कार

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयामधील रसायनशास्त्र अधिविभागातील सहाय्यक प्रा. दामोदर जनार्दन सुतार यांनी शिवाजी विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी संपादन केली. प्रा. सुतार यांनी 'फिजीकोकेमिकल स्टडीज ऑफ मिक्सड मेटल ऑक्साईड नॅनो कॉम्पोझिट फॉर देर देअर कॅटलिटीक एप्लीकेशनस्' यातून शोधप्रबंध सादर केला होता. त्यांच्या संशोधन कार्यासाठी संशोधक मार्गदर्शक प्रा. डॉ. जी. एस. गोकावी, प्रा. डॉ. एस. एन. झेंडे यांचे मार्गदर्शन लाभले. याबद्दल प्राचार्य. डॉ. एस. एम. मणेर यांनी अभिनंदन केले. यावेळी डॉ. अनिता घारे, डॉ. दिपक कुंभार, डॉ. स्वप्नजित मुळीक, प्रा. रामदास भरसाट व सहकारी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner



# डीकेएएससीला सलग चौथ्या वर्षी वसंत करंडक

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी या महाविद्यालयाने पद्मभूषण वसंतरावदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बुधगाव- सांगली आयोजित राज्यस्तरीय 'वसंत करंडक' स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करीत सलग चौथ्या वर्षी वसंत करंडक जिंकला. महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागातील कलाकार विद्यार्थ्यांनी पथनाट्य -प्रथम क्रमांक, गायन वादन -प्रथम क्रमांक, लोकनृत्य-दिवली द्वितीय क्रमांक, चित्रकला - द्वितीय क्रमांक, कथा लेखन - द्वितीय क्रमांक, लघुनाटीका - द्वितीय क्रमांक असे भरघोस यश संपादन करुन सलग चौथ्या वर्षी देखील 'वसंत करंडक' स्पर्धे चे सर्वसाधारण विजेतपद खेचून आणले आणि महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या अभिमानास्पद कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे व सर्व सदस्य यांचे हार्दिक अभिनंदन केले. सर्व यशस्वी कलाकार विद्यार्थ्यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार सांळुखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्था सीईओ कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# डीकेएएससीचे १२ वी परीक्षेत यश

**इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा**

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाने नुकत्याच जाहीर झालेल्या १२ वी बोर्ड परीक्षेत यश संपादन केले.

सायन्स विभाग – ९८.८८ टक्के, कॉमर्स विभाग – ८३.२७ टक्के, आर्टस् विभाग – ६१.६६ टक्के. असा निकाल लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी अभिनंदन केले.